# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट ५१-२३** **दिनांक :- १३/०२/२०२३**

**दत्तक विधान कागदपत्रांची प्रक्रिया पुर्ण न करता आपसात संगणमत करुन खंडणी मागणा-या आरोपीतांस अटक – नवघर पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगिरी.**

दि.१०.०२.२०२२ रोजी फिर्यादी नामे श्री. मनिष रामदेव शंकर, वय-४२ वर्षे, व्यवसाय- गॅरेज, रा. रुम नंबर ३०३, बि विंग, रवि अमन सोसायटी, गौरव संकल्प, फेज-२, हाटकेश, मिरारोड पुर्व ता.जि.ठाणे यांनी नवघर पोलीस ठाणेत फिर्याद दिली की, त्यांना दोन मुले असुन त्यांना व त्यांच्या पत्नीस मुलीची आवड आसल्याने त्यांनी त्या बाबत त्यांच्या मित्र परिवारांस मुलगी दत्तक घ्यावयाची आहे याबाबत कळविले होते.

डिसेंबर-२०२२ रोजी फिर्यादी यांचा मित्र चिराग मेहता यांच्या ओळखीचा इसम नामे अल्पेश कच्छिया याने फिर्यादी यांना संपर्क साधुन त्याची नवजात स्त्री अर्भक असुन त्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत बिकट आहे व मुलीची आई मुलीला जन्म देवुन पळुन गेली असल्याने सदर नवजात मुलगी ही दत्तक देणेबाबत सांगितले. त्यावेळी फिर्यादी यांनी अल्पेश कच्छिया याचेकडुन त्याचे नवजात स्त्री अर्भक दत्तक घेतले होते. तेव्हा अल्पेश कच्छिया याने फिर्यादी यांना मुलीची आई परत आल्यावर दत्तक बाबतची कायदेशीर कारवाई करु असे सांगुन मुलीच्या जन्मावेळी झालेला खर्च २०,०००/- रुपये इतके त्यांचाकडे मागितले. त्यावेळी फिर्यादी यांनी त्याच्यावर विश्वास ठेवुन अल्पेश कच्छिया यास २०,०००/- रुपये रोख रक्कम दिली.

त्यानंतर फिर्यादी अल्पेश कच्छिया याचाकडे वारंवार नमुद नवजात स्त्री अर्भक दत्तक घेण्याकरीताच्या कागदपत्रांची पुर्तता करण्याबाबत कागदपत्र मागु लागले. त्यामुळे अल्पेश कच्छीया हा त्याचे नवजात स्त्री अर्भक हे फिर्यादीकडुन परत घेवुन गेला होता. त्यानंतर दिनांक ०५/०१/२०२३ रोजी इसम नामे यश सोनी याचा फिर्यादी यांना फोन आला व त्याने त्यांना सांगितले की, अल्पेश कच्छीया याची पत्नी त्याचाकडे रुपये २,५०,०००/- रुपये मागत असुन सदर पैसे त्याने तिला दिले तरच ती मुलीच्या दत्तक कागदपत्रांची पुर्तता करण्यासाठी येणार आहे असे सागितले होते. त्यावेळी फिर्यादी यांनी अल्पेश कच्छिया व त्याचे मित्र यश सोनी, मनिष चौधरी व रोहीत सुतार यांना रुपये २,५०,०००/- देवुन नमुद नवजात स्त्री अर्भक परत घेतले होते. त्यानंतर देखील फिर्यादी यांना अल्पेश व त्याचे मित्र हे वारंवार फोन करुन त्यांनी दत्तक घेतलेल्या मुलीच्या कागदपत्रांची पुर्तता करण्याकरीता आणखीन पैश्यांची मागणी करुन लागले तसेच त्यांना त्यासाठी शिवीगाळी दमदाटी करुन खंडणी मागु लागले. त्यावेळी फिर्यादी यांना समजले की, त्यांची सदर प्रकरणात फसवणुक होवुन नमुद इसम हे वरील दत्तक बालकांचे पालक नसल्याचा संशय येवुन सदर अर्भक हे त्यांनी फिर्यादी यांना विक्री केले असल्याने त्यांनी नमुद इसमांचे विरोधात नवघर पोलीस ठाण्यात

गुन्हा रजि. नं. I ११४/२०२३ भा.द.वि.सं.कलम ३७०, ३८४, ३८५, १२० (ब), ५०४, ५०७, प्रमाणे दि.११/०२/२०२३ रोजी गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

वरिष्ठांचे मार्गदर्शन व सुचनेप्रमाणे नवघर पोलीस ठाणेतील गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी मोबाईलचे तांत्रिक विश्लेषण करुन आरोपीत १) यश हितेश सोनी, वय २४ वर्षे, रा. खाऊगल्ली रोड भाईंदर (प.) २) अल्पेशकुमार गिरीषभाई कच्छीया, वय ३३ वर्षे, व्यवसाय नोकरी, रा. जनतानगर रोड, शिवसेना गल्ली भाईंदर (प.) यांस दि.१०/०२/२०२३ रोजी ताब्यात घेतले. सदर आरोपीतांकडे विचारपुस केली असता नमुद नवजात स्त्री जातीचे अर्भक हे आरोपीत क्र. २ याचे स्व:ताचे नसल्याचे व ते त्याचे सोबत यापुर्वी काम करत असलेल्या महिलेचे असल्याचे निष्पन्न झाल्याने तीस देखील ताब्यात घेवुन विचारपुस केली असता नमुद गुन्हयात तीचा संबंध असल्याचे निष्पन्न झाल्याने तिला देखील अटक करण्यात आली. सदर गुन्हयात महिलेसमवेत ०२ आरोपीतांस अटक केलेली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास स.पो.नि. गणेश केकाण नेम. नवघर पोलीस ठाणे हे करीत आहे.

सदरची कामगिरी श्री. जयंत बजबळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ १, डॉ. श्री. शशीकांत भोसले, सहा.पो.आयुक्त, नवघर विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री. मिलिंद देसाई, वरिष्ठ पोलीस निरिक्षक, पो.नि. श्री. सुशिलकुमार शिंदे (गुन्हे), पो.नि. प्रकाश मासाळ, स.पो.नि. योगेश काळे, गणेश केकाण, पो.उप.नि. अभिजीत लांडे, म.पो.उप.नि. सारीका वाघचौरे, पो.हवा. भुषण पाटील, नवनाथ घुगे, सुरेश चव्हाण, पो.अंम. चेतन राजपुत, सुरज घुनावत, ओंकार यादव सर्व नेम. नवघर पोलीस ठाणे यांनी केलेली आहे.

--------------ooooo--------------